# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २०/०७/२०२५ (रविवार)**

---

## पोलीस स्टेशन सावनेर अंतर्गत पोलीसांना शासकीय कामात अडथळा निर्माण करून शासकीय वाहनाचे नुकसान करणाऱ्या दोन आरोपीतांना अटक

पोलीस स्टेशन सावनेर :— दिनांक १७/०७/२०२५ रोजी रात्री सदर गुन्हयातील फिर्यादी श्रेणी पोउपनि राजेश प्यारेलाल तिवारी ,नेम. पोलीस स्टेशन सावनेर हे पोलीस स्टाफ सह रात्रगस्त व चेकिंग डयुटी असतांना आदासा फाटा, धापेवाडा येथे पांढ—या रंगाची पल्सर गाडी क्र एम एच ४९ सी जे १३९४ चा चालक अक्षय उर्फ बुंदी शामसुंदर गुरवे,वय १९ वर्ष ,रा धम्मदिप, नगर नागोबा मंदिरा जवळ, यशोधरा नगर नागपुर व त्याचे इतर दोन साथीदार यांचे सह लिंबाणी प्लायवुड दुकाना समोर यु टर्न मारून संशयित रित्या रॉग साईडने पळुन जातांनी दिसल्याने शासकीय वाहन बोलेरो एम एच ३१ एन ५२४८ ने त्यांचा पाठलाग करून त्यांना त्याची गाडी थांबविण्यास सांगितले असता यातील आरोपीतानी संगणमत करून फिर्यादी व त्यांचे सोबत असलेला पोलीसांना कर्तव्य पार पाडण्यापासुन परावृत्त करण्याकरीता शासकीय वाहन क्रं एम एच ३१ एन ५२४८ या वाहनावर लोंखडी टॉमीने वार करून कट मारून शासकिय गाडीचे बॉनेट ,बफर व फेंडर चे अंदाजे ५००० रू चे नुकसान केले. सदर वेळी आरोपीजवळ धारधार शस्त्र चाकु सुध्दा होता. सदर प्रकरणी पोलीस स्टेशन सावनेर येथे अप क्र ६१४/२५ कलम १३२, ३(५),भा. न्या.स २०२३ सह.कलम ४,२५ हत्यार कायदा सह.क. ३ सार्वजनिक मालमत्ता नुकसान प्रतिबंध अधिनियम १९८४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे०

**नमुद गुन्हयातील आरोपी क्रं १. अक्षय उर्फ बुंदी शामसुंदर गुरवे, वय १९ वर्षे, रा नागोबा मंदीराजवळ, धम्मदीप नगर, पोलीस स्टेशन यशोधरा नगर आरोपी क्रं २ नामे महेंद्र उर्फ मयंक उर्फ चरसी कुंवरसिंग शाहु, वय २२ वर्षे,रा सिध्दी किराणा जवळ, धम्मदीप**

नगर, गल्ली क्रं २ पोलीस स्टेशन यशोधरा नगर यांना सदर गुन्हयात सावनेरी पोलसांनी अटक केली आहे. नमुद आरोपी हे नागपुर शहर ,यशोधर नगर पोलीस स्टेशन येथील रेकॉर्ड वरील आरोपी असुन त्यांच्यावर खुनाचा प्रयत्न, चोरी, घरफोडी ,अवैध हत्यार बाळगणे या सारखे अनेक गुन्हे नोंद आहे.



आरोपी अक्षय उर्फ बुंदी शामसुंदर गुरवे



**आरोपी महेंद्र उर्फ मयंक उर्फ चरसी कुंवरसिंग शाहु**

## शासकीय कामात अडथळा निर्माण करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन कन्हान :—** दिनांक १७/०७/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गोपनिय माहीती मिळाली की, बतावणी करून बनावट सोने वाक्री करणारे इसम पोलीस स्टेशन कन्हान अंतर्गत मौजा तारसा येथील रोड लगतच्या जंगल परीसरात येणार आहे. अशी माहीती मिळाल्याने स्थानिक गुन्हे शाखेचे सपोनि मनोज गदादे हे त्यांच्या पथकासह सदर ठिकाणी गेले असता दोन इसम संशयीतरित्या फिरत असतांना दिसुन आल्याने पोलीसांनी त्यांना आवाज देवुन थांबवण्याचा प्रयत्न केला असता ते झुडपी जंगलात पळु लागले त्यामुळे पोलीसांनी त्यांचा पाठलाग केला असता अजुन दोन अनोळखी इसम त्यांच्या सोबत असल्याचे समजले. पोलीसांचा संशय बळावल्याने त्यांनी नमुद चार अज्ञात इसमांचा जंगल परीसरात पाठलाग केला असता नमुद चारही अज्ञात आरोपीतांनी झुडपी जंगलाचा फायदा घेवुन पोलीसांवर अचानक दगडफेक केली.पाठलाग

करीत असतांना सर्वांत समोर असलेले पोलीस अंमलदार अमित मेहरे यांच्या आंगावर एक दगड आल्याने त्यांचा पाय घसरल्याने ते पडले त्यामुळे त्यांना **किरकोळ दुखापत** झाली आहे.

नमुद प्रकरणी पोलीस स्टेशन कन्हान येथे ४ अज्ञात आरोपीतांविरूध्द अप क्र. ४९८/२५,कलम १३२, १२१ (१), १२५ (ए), भा.न्या.स २०२३ अन्वये गुन्हा नोंद केला आहे. **नमुद अज्ञात आरोपीतांचा शोध घेवुन अटक करणे कामी पोलीसांचे एक विशेष पथक तयार करण्यात आले आहे.**

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद भिवापुर पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन भिवापुर :- दिनांक १९/०७/२०२५ रोजी भिवापुर पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक होत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी स्वरूप बार तास कॉलनी जवळ नाकाबंदी केली असता एक संशयीत १६ चक्का टिप्पर क्रमांक एम,एच ३१ एफ. सी. ७५०० हे वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. वाहन **चालक आरोपी नामे दिपक रामचंद्र दळवी, वय ३८ वर्षे, रा. राजेश्वर नगर, हनुमान मंदीर जवळ, प्लॉट नंबर ४९ गोदणी, झिंगाबाई टाकळी, नागपुर** याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. वाहन मालकाबाबत विचारपुस केली असता वाहन **मालक आरोपी नामे गणेश शाहु, रा.काटोल नाका, नागपुर** अशी माहीती पोलीसांना प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष वाहना मधुन **१)** १२ ब्रास रेती किंमती ६०,०००/- रूपये आणि **२)** टिप्पर क्रमांक एम.एच. ३१ एफ. सी. ७५०० किंमती ५०,००,०००/- रूपये **असा एकुण ५०,६०,०००/- रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**नमुद आरोपी चालक आणि मालक यांच्या विरूध्द पोस्टे भिवापुर येथे कलम ३०३(२) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सह कलम ४,२१ खाण खनिज अधिनियम सहकलम ३ सार्व. संपत्ती नुकसान प्रति. अधि. सहकलम**

**१५ पर्या. संरक्षण अधि.अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.**

## अवैधरीत्या गांजा (अंमली पदार्थ) बाळगुन विक्री करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद, स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

दिनांक १९/०७/२०२७ रोजी स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांचे पथक अवैध धंदयावर कारवाई करणे कामी पोलीस स्टेशन कोंढाळी हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना असता गोपनीय माहिती मिळाली की, मौजा बाजारगाव येथे **आरोपी नामे राजु धर्माजी सलामे, वय ५५ वर्ष, रा. वार्ड क्र. ०४, बाजारगाव** हा अवैधरित्या गांजा बाळगुन विक्री करतो. अशी माहीती मिळताच सदर पथकाने तात्काळ घटनास्थळी जावुन पंचासमक्ष आरोपीच्या घराची झडती घेतली असता गांजा व इतर मुद्देमाल मिळुन आला. **आरोपीच्या ताब्यातुन १) १२ नग ट्रान्सपरंट प्लास्टीक पन्नीमध्ये गुंगीकारक वनस्पती ओलसर गांजा वजन ४०.ग्रॅम किंमती ८००/—रूपये, २) रोख रक्कम किंमती ३२,१५०/— रूपये ,३) एक ॲन्ड्रॉईड मोबाईल १०,०००/—रूपये असा एकुण ४२,९५०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

नमुद आरोपी विरुध्द पोस्टे कोंढाळी येथे कलम ८ (क), २०(ब), २९ एन.डी.पी.एस. कायदयान्वये गुन्हा नोंद केला आहे.

## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा नोंद ११ गोवंश जनावरांची सुटका, कुही पोलसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कुही** :— दिनांक १९/०७/२०२५ रोजी कुही पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, बोलेरो चारचाकी वाहना मध्ये अवैधरित्या जनावरांची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस नमुद वाहनाचा शोध घेत असतांना मौजा चांपा टोलनाका येथुन एक बोलेरो पिकअप वाहन क्रमांक. एम. एच. ४० बी एल ८५५४ हे वाहन हे भरधाव वेगाने जाताना दिसले. त्यावरून पोलीसांनी तात्काळ नमुद वाहनाचा पाठलाग केला असता आरोपी चालक हा वाहन सोडुन पळुन गेला.

पोलीसांनी वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये **११ गोवंश जनावरे** असे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन,शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. **पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून एक बोलेरो पिकअप वाहन क्रमांक एम.एच. ४० बी एल ८५५४ किंमती ५,००,०००/— रूपये. व ११ गोवंश जनावरे किंमती ९५,००० /— रूपयाचा एकुण ५,९५,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला.**

**नमुद प्रकरणी बोलेरो पिकअप वाहन क्रमांक एम.एच. ४० बी एल ८५५४ चा चालक आरोपी याच्या विरूध्द महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम आणि प्राण्यांचा छळ अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे.**

.

## अवैधरित्या मोहाफुल गावठी दारु काढणा—या ५ आरोपीतांवर ५ गुन्हे नोंद कुही पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कुही** :— दिनांक २०/०७/२०२५ रोजी कुही पोलीसांना पारधी बेडा येथे अवैध्यरित्या मोहाफुल गावठी दारु काढणारे इसमाबाबत गोपनिय माहीती प्राप्त झाली. कुही पोलीसांनी पाच पथके तयार करून एकाच वेळी कार्यवाही केली. अवैधरित्या मोहाफुल गावठी दारु काढणारे एकुण ०५ महिला आरोपीचे ताब्यातुन ५२ ड्रम मध्ये एकुण ५२०० लिटर मोहाफुल सडवा कि. १,८२,०००/—रुपये, प्लास्टीक ड्रम किंमत १०,४००/— रुपये असा एकुण १,९२,४००/— रुपयाचा मुददेमाल मिळुन आल्याने मोक्यावर पंचनामा कार्यवाही करुन नाश करण्यात आला आहे. ०५ महिला आरोपी यांचे विरुध्द पोस्टे कुही येथे कलम ६५ (ई)(फ) महाराष्ट्रदारुबंदी अधिनियम अन्वये ०५ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.





# रात्र गस्त दरम्यान कोबींग ऑपरेशन राबवुन केले रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक आणि नाकाबंदी करून तपासली वाहने, हद्दपार आरोपीवर गुन्हा नोंद


दिनांक १९/०७/२०२५ चे २३:०० वा. ते दिनांक २०/०७/२०२५ चे ०५:०० वा. दरम्यान जिल्हा गस्त मध्ये श्री संतोष गायकवाड, उपविभागिय पोलीस अधिकारी, कन्हान उपविभाग यांनी संपुर्ण जिल्हयात सतर्कपणे गस्त केली. तसेच कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान अंतर्गत शिवनगर, फुकटनगर, शिवाजी नगर, धरमनगर पिपरी, सुपर टाउन आणि संताजी नगर येथे श्री संतोष गायकवाड यांच्या नेतृत्वात पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले. सदर वेळी पोलीस स्टेशन कन्हान येथील अधिकारी ,अंमलदार आणि दंगा नियत्रंण पथक चे पोलीस अंमलदार हजर होते. कोबिंग ऑपरेशन राबवुन रेकॉर्डवरील गुन्हेगार, जेल रिलीज गुन्हेगार, निगराणी बदमाश तसेच अवैध दारू विक्रेते गुन्हेगार चेक करून त्यांचे घराची पंचासमक्ष घरझडती घेण्यात आली. गांधी चौक, कन्हान येथे नाकाबंदी करून संशयीत वाहनांची तपासणी करण्यात आली.तसेच रात्रगस्त दरम्यान अविनाश उर्फ लंगडा सुखचंद सहारे, वय २४ वर्ष, रा.तुकाराम नगर कन्हान, हा नागपुर जिल्हयातुन हद्दपार असतांना देखील मिळुन आल्याने मा.पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांचे हददपार आदेशाचे उल्लंघन केल्याने नमुद आरोपीवर कलम १४२ महाराष्ट्र पोलीस कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.






24MM F/1.9




मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने